# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 02 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०२ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.**

****

- कृत्रिम बुद्धिमत्ता भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासरथ म्हणून पुढे येत असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- विकसित भारत जी–राम जी योजनेत शेती आणि रोजगार हमी यांचा योग्य समतोल साधला असल्याची केंद्रीय कृषिमंत्र्यांची माहिती
- ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं आज ज्येष्ठ साहित्यिक डॉ मृदुला गर्ग यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन

आणि

- महानगरपालिका निवडणुकीत अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस

****

भारत ही जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वेगानं वाटचाल करत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता – एआय ही भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासरथ म्हणून उदयास येत असल्याचं प्रतिपादन, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. काल राष्ट्रपती भवनात, कृत्रिम बुद्धिमत्ता तयारी कौशल्यांवरील एका विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कृत्रिम बुद्धिमत्ता हे फक्त तंत्रज्ञान नसून, सकारात्मक बदल घडवून आणण्याची संधी असल्याचं त्यांनी नमूद केलं. डेटा सायन्स, आर्टिफिशियल इंजिनिअरिंग आणि डेटा विश्लेषण यासारखी कौशल्यं देशातील एआय टॅलेंट पूल विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास राष्ट्रपतींनी व्यक्त केला.. त्या म्हणाल्या...

**बाईट – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

****

डिसेंबर २०२५ मध्ये वस्तू आणि सेवा कर – जीएसटीचं एकूण संकलन एक लाख ७५ हजार कोटी रुपये इतकं झालं आहे. डिसेंबर २०२४ च्या तुलनेत हे प्रमाण सहा टक्क्यांनी अधिक आहे.

दरम्यान, युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस अर्थात युपीआय व्यवहारात २०२५ च्या डिसेंबरपर्यंत मोठी वाढ झाली असून, २१ पूर्णांक ६३ अब्ज रुपयांचे व्यवहार झाले आहेत. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशननं ही माहिती दिली. २०२४ च्या तुलनेत ही वाढ २० टक्के अधिक आहे.

****

मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या पहिला टप्प्याचं १५ ऑगस्ट २०२७ रोजी लोकार्पण होणार आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मुंबई ते अहमदाबाद पर्यंतच्या या रेल्वेसेवेला टप्प्याटप्प्याने प्रारंभ होणार असून, सर्वप्रथम सुरत ते बिलिमोरा हा टप्पा सुरू होणार असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. ते म्हणाले...

**बाईट– केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव**

देशातली पहिली वंदे भारत शयनयान सेवा असलेली रेल्वे लवकरच गुवाहाटी ते कोलकाता दरम्यान सुरु होणार असल्याचं रेल्वेमंत्र्यांनी सांगितलं. नवी दिल्लीत एका चर्चासत्रात ते काल बोलत होते. येत्या १५ ते २० दिवसात पंतप्रधान नरेंद्र मोदी या नव्या रेल्वेगाडीला हिरवा झेंडा दाखवतील, अशी माहिती त्यांनी दिली.

****

'विकसित भारत जी–राम जी' योजनेत शेती आणि रोजगार हमी यांचा योग्य समतोल साधला असल्याचं, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. ते काल अहिल्यानगर जिल्ह्यात राहाता तालुक्यातल्या लोणी बुद्रुक इथं 'विकसित भारत जी–राम जी' अभियानांतर्गत आयोजित विशेष ग्रामसभेत बोलत होते. गावाच्या विकासाचे निर्णय आता दिल्ली किंवा मुंबईतून न होता, थेट ग्रामसभेच्या माध्यमातून गावकऱ्यांनीच घ्यायचे असल्याचं, चौहान यांनी सांगितलं. ते म्हणाले,

**बाईट– केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान**

मनरेगा योजनेतल्या त्रुटींच्या तुलनेत नव्या योजनेतल्या तरतुदींचा चौहान यांनी यावेळी सविस्तर आढावा घेतला.

****

पुणे जिल्ह्यात कोरेगाव भीमा इथं शौर्यदिन काल साजरा झाला. या ठिकाणी असलेल्या विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी हजारो नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

****

२०२५ मध्ये जगभरातल्या १२८ पत्रकारांना ठार केल्याची माहिती, आंतरराष्ट्रीय पत्रकार महासंघाच्या अहवालात देण्यात आली आहे. पत्रकारांसाठी मध्य पूर्व आणि अरब देश सर्वाधिक धोकादायक ठरले असल्याचं या अहवालात सांगितलं आहे. गाझा युद्धाशी संबंधित घटनांमध्ये पॅलेस्टीनमध्ये सर्वाधिक ५६ पत्रकार मारले गेले, भारतात चार पत्रकारांचा अशाप्रकारे मृत्यू झाल्याचं या अहवालात सांगण्यात आलं आहे.

****

सातारा इथं आज नव्व्याणवाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे नियोजित अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील या समारंभाला उपस्थित राहतील. दरम्यान, काल ग्रंथदिंडीने या संमेलनाला प्रारंभ झाला. या ग्रंथ दिंडीत मान्यवर साहित्यिकांसह साहित्यप्रेमी नागरिक सहभागी झाले होते. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी, तसंच मावळत्या अध्यक्ष डॉ तारा भवाळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. त्यानंतर प्रकाशन कट्टा, कवी कट्टा, गझल कट्टा याचंही उद्घाटन करण्यात आलं. चार दिवस चालणाऱ्या या साहित्य संमेलनात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल बीड शहरातल्या सहकार संकुल भूमिपूजनासह ५७५ कोटी रुपयांच्या एक हजार २१६ विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

****

शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जासाठी मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल हिंगोलीत ही घोषणा केली. ते म्हणाले...

**बाईट – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

हिंगोलीतील जलेश्वर तलावाच्या 'गाळामुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत काम केलेल्या शेतकऱ्यांना बावनकुळे यांच्या हस्ते अनुदानाचं वाटप करण्यात आलं. तलावातला गाळ काढून खोली वाढवणं आणि तोच गाळ शेतामध्ये टाकून शेतीची सुपीकता वाढवण्यासाठी राबवलेला हा उपक्रम हिंगोली पॅटर्न म्हणून नावारुपाला येईल, संपूर्ण राज्यात हा उपक्रम राबवण्यात बाबत सूचना देण्यात येतील असंही बावनकुळे यांनी जाहीर केलं.

**

दरम्यान, आगामी महापालिका निवडणुकीत बंडखोरी करून उमेदवारी अर्ज भरलेल्या उमेदवारांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू असून, यातून नक्कीच तोडगा निघेल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

****

महानगरपालिका निवडणुकीत अर्ज मागं घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. धुळे महानगरपालिकेत काल दोन अपक्ष महिला उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले, यामुळे भारतीय जनता पक्षाच्या सुरेखा चंद्रकांत उगले या आणखी एक महिला उमेदवाराचा बिनविरोध विजय निश्चित झाला.

नाशिक जिल्ह्यात मालेगाव महापालिकेतील छाननीच्या वेळी प्रभाग ६ मध्ये अन्य स्पर्धक पक्षांचे उमेदवारी अर्ज बाद झाल्याने इस्लाम पार्टीच्या मुनीरा शेख यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

****

जालना इथल्या लघू पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याला एक लाख रुपयांची लाच घेताना काल पकडण्यात आलं. रोहीत देशमुख असं त्याचं नाव असून, शासनाने पुनर्वसनासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळवून दिला म्हणून त्याने ही लाच मागितली होती.

हिंगोली इथं वस्तू आणि सेवा कर विभागाच्या कर सहाय्यकासही २० हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने काल रंगेहात

पकडलं. व्यावसायिक कराची नोटीस रद्द करण्यासाठी त्याने ही लाच मागितली होती.

****

धाराशिव इथं अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना आणि उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांच्या उपस्थितीत रस्ते सुरक्षा अभियान २०२६ ची काल सुरुवात करण्यात आली. हेल्मेट परिधान करून बाईक रॅलीला त्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

****

तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी मातेच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवादरम्यान श्री तुळजाभवानी देवीची काल श्री भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात आली होती. नवरात्रोत्सवादरम्यान देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे.

****

नांदेड जिल्ह्यात गौण खनिजांचं अनधिकृत उत्खनन थांबवण्यासाठी कडक अंमलबजावणी करण्यात येणार आहे. अशा बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी वाहनांचा परवाना रद्द करण्यासारखी कठोर कारवाई करण्यात येणार आहे. दोषींविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाईसाठी परिवहन विभागाने संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तत्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

****

राज्यात काल सर्वात कमी साडे आठ अंश सेल्सियस तापमान गोंदिया इथं नोंदवलं गेलं. त्याखालोखाल जळगाव इथं नऊ पूर्णांक दोन तर अहिल्यानगर इथं नऊ पूर्णांक तीन दशांश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात बीड इथं ११, परभणी इथं १३ पूर्णांक एक, तर छत्रपती संभाजीनगर इथं १३ पूर्णांक सात अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं.

****